# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, चंद्रपूर

## विधी स्वयंसेवक (अधिकार मित्र) पदाकरीता

## जाहिर सूचना

## दिनांक १३/१०/२०२६

राष्ट्रिय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली तसेच महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांचे आदेशान्वये जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय, चंद्रपूर मार्फत कायदेविषयक माहिती लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी व गरजु व्यक्तीस कायदेविषयक सहाय्य व सल्ला देण्यासाठी ईच्छुक असलेल्या उमेदवारांनी त्यांचे अर्ज नमुण्यात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे दिनांक ३१/१०/२०२६ रोजी सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत पोहोचतील असे पाठवावे. त्यानंतर आलेले अर्ज स्किारण्यात येणार नाहीत. निवड करण्यात आलेल्या विधी स्वयंसेवक (अधिकार मित्र) यांना प्राधिकरणा मार्फत कोणत्याही प्रकराचा पगार/भत्ता मिळणार नाही. केवळ जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, चंद्रपूर यांनी ठरवून दिल्यानुसार मानधन मिळण्यास विधी स्वयंसेवक (अधिकार मित्र) पात्र राहील. अर्जदार कमीत कमी १०वी उत्तीर्ण असावा.

**खालील अर्हताधारक व्यक्तींच्या अर्जांना प्राधान्य देण्यात येईल** :—

१. निवृत्त शिक्षक,
२. माजी पंचायत सदस्य,
३. सेवा निवृत्त शासकीय कमचारी,
४. समाज सेवक,
५. महिला,
६. ट्रन्सजेंडर,
७. आदिवासी समूदाय,
८. समाजातील दर्लक्षीत वर्ग (Marginalized sections of society)
९. ईतर उच्च पदस्थ व्यक्ती

अर्जाच्या विहीत नमुन्यासाठी व इतर माहितीसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय, चंद्रपूर येथे संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, चंद्रपूर तर्फे करण्यात आले आहे.

13/10/26

सचिव,
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,
चंद्रपूर

पृष्ठांकन क्रमांक जिविसेप्रा/२३४१/२०२६, दिनांक १३ ऑक्टोबर, २०२६

१. मा. अध्यक्ष, जिल्हा बार असोसिएशन, चंद्रपूर यांना नोटिस बोर्डवर प्रकाशीत करण्याकरीता सादर.

२. सहा. अधिक्षक (संगणक), जिल्हा न्यायालय, चंद्रपूर यांनी जिल्हा न्यायालयाच्या संकेत स्थळावर प्रकाशीत करण्याकरीता संबंधीतांना निर्देशीत करण्यात यावे.

13/10/26

सचिव,
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,
चंद्रपूर

प्रति,

मा. सचिव,
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,
चंद्रपूर

**विषय** : विधी स्वंय सेवक पदाकरिता आवेदनपत्र सादर करणेबाबत.

आदरणीय महोदय,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने सेवेशी सविनय सादर करण्यात की, मी नामे ——————————————————————————————वय—————वर्ष———— रा.——————————————————————येथील रहिवाशी आहे.

मी सामाजिक क्षेत्रामध्ये कार्य करण्यास उत्सुक असल्याने व मला सदरहु कार्याची आवड असल्यामुळे मी विधी स्वंयसेवक पदाकरीता अर्ज करीत आहे.

सदर पदाकरीता माझी निवड झाल्यास मला विधी स्वयंसेवक पदाच्या सर्व अटी/शर्ती मान्य असेल, तसेच विधी स्वंयसेवक म्हणुन मला देण्यात येणारी जबाबदारी मी प्रामाणिकपणे पुर्ण करील.

सबब मला विधी स्वयंसेवक म्हणुन कार्य करण्याची संधी प्रदान करण्यात यावे ही विनंती. करीता प्रस्तुत विनंती अर्ज सविनय सादर.

आपला विश्वासू,

दिनांक :

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी

सहपत्र :

१)आवेदनाचा नमुना
२)शैक्षणीक व अनुभव प्रमाणपत्रे
३)आधार कार्ड
४)पासपोर्ट फोटो

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, चंद्रपूर

## विधी स्वयंसेवक पदाकरीता आवेदनाचा नमुना

अर्जदाराचे फोटो

१) उमेदवारांचे पुर्ण नाव : ____________________

२) संपूर्ण पत्ता : ____________________

____________________

३) संपर्क क्रमांक : ____________________

४) ई–मेल आयडी : ____________________

५) जन्म दिनांक व वय : ____________________

६) शैक्षणिक पात्रता : ____________________

____________________

७) संगणकीय ज्ञान : ____________________

____________________

८) कार्य/अनुभव संबंधीचा तपशील : खालील रकान्यात नमुद करावे

| अ. क्र. | कार्य केलेले ठिकाण नाव व पत्ता | पद | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |

९) अन्य (विशेष कार्य माहिती) : ____________________

____________________

____________________

१०) विधी स्वयं सेवक म्हणुन कार्य : ____________________
करण्यात इच्छुक असल्याची ____________________
कारणे ____________________

# घोषणापत्र

मी ---------------------------------------------------------------- या द्वारे असे लिहून देतो/देते की, माझेविरूध्द कोणतेही फौजदारी प्रकरण कोणत्याही न्यायालयात दाखल नाही. वरिल संपूर्ण माहिती खरी व बरोबर आहे. माहिती खोटी निघाल्यास होणाऱ्या कायदेशीर कार्यवाहीस मी पूर्णपणे जबाबदार असेन. तसेच मी असेही नमूद करतो की, मला विधी स्वयंसेवक पदाकरीता मा. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांनी ठरविलेल्या मानधनाशिवाय कोणतेही पगार/मजूरी/मोबदला मिळणार नाही याची मला जाणीव आहे. मी विधी स्वयंसेवक म्हणून समाजातील गरजूवंतांची कमकुवत व अशक्त वर्गाचे जिवनमान उंचावण्यासाठी व त्यांना विधी सेवा मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न व कार्य करील.

ठिकाण :

दिनांक : अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी